| |
|---|
| नि.फौ.ख.क्र.२१७०/२००६ |
| सरकार -वि- भिमराव |
| निशाणी क्र. ६ |

**फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २९९ नुसार पुरावा**

**सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ यांची शपथेवर सरतपासणी**

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

| | | |
|---|---|---|
| **नांव** | : | रमेश रामभाऊजी थेटे, |
| **वय** | : | ५३ वर्षे, |
| **धंदा** | : | खाजगी नोकरी, |
| **राहणार** | : | झिंगाबाई टाकळी, नागपूर |

**सरकार पक्षातर्फे विद्वान सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती अमृता सोले यांचेमार्फत**

दिनांक १०.०४.२००२ रोजी गिट्टीखदान पोलीसांनी मला कोठेही बोलावले नाही. माझ्यासमक्ष कोणतीही कारवाई करण्यात आली नाही. मला आता घटनास्थळ पंचनामा दिनांक १०.०४.२००२ दाखविण्यात आला. त्यावर माझी पंच क्र. २ म्हणून सही आहे. सदर सही मी कोठे व केव्हा केली हे मला आठवत नाही. सदर पंचनाम्यातील मजकूर मला माहीत नाही. सदर पंचनाम्यावरील सहीला **निशाणी पी-१** देण्यात येतो.

**सरकारी अभियोक्तांच्या विनंतीवरुन साक्षीदार अभियोगपक्षास सहाय्य करीत नसल्याने उलट तपासणी घेण्याची परवानगी देण्यात आली. उलटतपास सरकारी अभियोक्तांतर्फे**

२. मी फिर्यादी वसंता चौधरी यांना ओळखतो. त्यांचे घर झिंगाबाई टाकळी येथे माझ्या घराच्या बाजुला आहे. हे मला माहीत नाही की, फिर्यादीच्या घराजवळ फिर्यादीचे आरोपीशी भांडण झाले होते व त्याबाबत पोलीस त्या ठिकाणी आले होते. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी मला त्याठिकाणी माझ्यासमक्ष घटनास्थळ पंचनामा तयार केला, त्यातील मजकूर मला वाचून दाखविला व तो बरोबर असल्याने मी त्यावर सही केली. हे

म्हणणे खरे आहे की, फिर्यादी मरण पावला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीला वाचविण्यासाठी खोटी साक्ष देत आहे.

श्रवणोत्तर स्वीकृत

माझे समक्ष

ANAMIKA DEBASHISH BOSE

Digitally signed by ANAMIKA DEBASHISH BOSE
Date: 2026.03.12 16:07:11 +0530

( **अनामिका दे. बोस** )
अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,
नागपूर.

दिनांक १२.०३.२०२५